जाहीर निविदा

तमाम पुरवठादार यांस याद्वारे कळविण्यात येते की, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे शासकीय निवासस्थानातील कार्यालयात बसविणेत आलेल्या इन्व्हर्टरसाठी 150 Ah Exide Tall Tubular बॅटरी नग २ बायबॅकने (Buy Back) खरेदी करणेसाठी येणा–या खर्चाची दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नावे असावे. सदर लखोटयावर **"बॅटरी खरेदी करणेकरीता दरपत्रक "** असे नमूद असावे.

२) दरपत्रक सादर करणा–या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड, बॅंक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) पुरवठादार जुन्या दोन बॅट–या बायबॅकने (BuyBack) घेणेस तयार असतील तर त्यांच्या बायबॅक रक्कमेचा दरपत्रकामध्ये स्पष्ट उल्लेख करावा.

५) वस्तूच्या दर्जाबाबत खात्री पुरवठादार यांनी दयावयाची आहे. हमी कालावधीत बॅटरीमध्ये बिघाड झाल्यास ते नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६) सदर बॅट–या मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे शासकीय निवासस्थानातील कार्यालयात पोहोच करुन त्या तेथील इन्व्हर्टरला जोडून देण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादार यांची राहील. त्याकरीता येणारा वहातुकीचा खर्च, बसविणेकरीता येणारा खर्च तसेच तत्संबंधी येणारा अन्य खर्च संबंधीत पुरवठादार यांनी सोसावयाचा आहे.

७) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

८) जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी ३ वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर, अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचा राहील.

९) बॅट–या जोडून दिल्यानंतरच देयकाची रक्कम अदा करणेत येईल.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि.०७/११/२०२६** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय , सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

दिनांकः- ३१/१०/२०२६

सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./ ०९०५ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः- ३१/१०/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर -

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई-मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता